# पुरक टिप्पणी

## आश्वासन क्र. १६५ च्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रणं संस्थेद्वारे राज्यात एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृतीपर विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी

एड्सवर पूर्णत्वाने मात करण्याकरीता कोणतेही औषध वा लस अद्यापी उपलब्ध नसल्यामुळे या रोगाला प्रतिबंध करणे हाच एकमेव उपाय सध्या उपलब्ध आहे. या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी भारतात केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम जागतिक बॅकेच्या अर्थसहाय्याने सन १९९२ पासून राबविण्यात येत आहे. राज्यात एड्स नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेची स्थापना माहे जुलै १९९८ मध्ये करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाच्या पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यांच्या दरम्यान आलेल्या अनुभवावरुन एनएसीपी IV चा कालावधी (सन २०१२-२०१७) अर्थात राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाचा चौथा टप्पा तयार करण्यात आला असून सदर टप्पा माहे मार्च-२०१९ पर्यंत वाढविण्यात आला आहे. कार्यक्रमाची रचना, त्याची उद्दिष्टे, अंमलबजावणीचे प्राधान्यक्रम आदी सर्व गोष्टी ठरविताना विविध स्तरावर व्यापक प्रमाणात सल्लामसलत करण्यात आली आहे. वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ, अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तीच्या संघटना, संशोधक, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती या सर्वांबरोबर सर्वसमावेशक असा हा कृती कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

एनएसीपीटप्पा-४ चे ध्येयः

- भारतातील एचआयव्ही संसर्गाचा वेग कमी करणे व एकात्मिक प्रतिसाद वाढविणे.

एनएसीपी फेझ-४ चे मुख्य उद्दिष्टे :

- नवीन संसर्ग ५० टक्क्यांनीकमी करणे.
- सर्व एचआयव्ही/एड्स संसर्गितांना व्यापक काळजी , आधार व उपचाार पुरविणे.

एनएसीपी फेझ -४ टप्प्याच्या मुख्य हेतू हा खालीलप्रमाणे आहे.

- प्रतिबंध सेवांची गती वाढवून त्या संचित करण्याबरोबर अतिजोखमींच्या गटावर व प्रभावित लोक लक्ष केंद्रित करणे.
- माहिती शिक्षण व संवाद यांचा विस्तार करुन सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचणे, तसेच अतिजोखीम व प्रभावीत लोकांपर्यंत पोहचवून त्यांच्या वागणूकीत बदल घडवून आणणे व सेवांची मागणी वाढविणे.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या माध्यमातून खालीलप्रमाणे कार्य केले जाते.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात विविध प्रकारे एचआयव्हीचा प्रतिबंध व उपचार करण्याच्या दृष्टीने ३४ जिल्हयांमध्ये (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) ५९५ स्वावलंबी आयसीटीसी केंद्रे, ०८ मोबाईल आयसीटीसी, २ जेल आयसीटीसी, व १८ पीपीपी केंद्रे अशा एकूण ६२३ आयसीटीसी केंद्रे आहेत. तसेच १,८११ प्राथमिक आरोग्य केंद्रे, १६६ शहरी आरोग्य केंद्रे, १३५६ पी.पी.पी. केंद्रे व २९ जेल आयसीटीसी अशा एकूण ३३६२ एफआयसीटीसी आहेत. त्यामुळे राज्यातील ग्रामीण रुग्णालय स्तरापर्यंत समुपदेशनाची व एचआयव्ही चाचणीची सोय उपलब्ध झालेली आहे. सदर एकात्मिक सल्ला व

चाचणी केंद्रामधून तळागाळातील लोकांपर्यंत एचआयव्ही/एड्स बाबत सर्व सेवा पोहोचविण्यात येत आहे. सन २०११ मध्ये सदर आयसीटीसी केंद्राद्वारे १५,७४,३३३ व्यक्तींची तपासणी करण्यात आली व त्यापैकी ५४,१६७ पॉझिटीव्ह व्यक्ती शोधून काढण्यात आले व त्यानंतर प्रत्येक वर्षी तपासणी करणाऱ्या व्यक्तींची संख्या वाढत गेली व त्यातून पॉझिटीव्ह येणारे रुग्ण हे सातत्याने कमी होत गेले जसे सन २०१७ मध्ये एकूण २६,६५,९४३ व्यक्ती तपासण्यात आले व त्यापैकी २१,६२२ पॉझिटीव्ह व्यक्ती शोधून काढण्यात आले. तसेच जानेवारी २०१८ ते सप्टेंबर २०१८ पर्यंत २२,३७,२८० व्यक्तींची एचआयव्ही तपासणी करण्यात आली व त्यापैकी १५,११९ पॉझिटीव्ह व्यक्ती शोधून काढण्यात आले.

पालकांकडून (मातेकडून) त्यांच्या होणाऱ्या अर्भकास एचआयव्हीचा संसर्ग प्रतिबंध व उपचारः

एच.आय.व्ही. संसर्गित मातांकडून त्यांच्या होणा-या अर्भकास एच.आय.व्ही. चा संसर्ग होऊ नये यासाठी हा प्रकल्प महाराष्ट्र (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) राज्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमामध्ये एच.आय.व्ही. गरोदर मातांचे समुपदेशन व ऐच्छिक रक्त तपासणी केली जाते. मातेपासुन नवजात अर्भकाला एच.आय.व्ही. चा संसर्ग होऊ नये म्हणून एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्रामध्ये रक्त तपासणी केल्यानंतर जर माता एच.आय.व्ही. पॉझेटिव्ह असल्याचे आढळून आली तर त्यांना त्वरीत ए.आर. टी. ट्रीटमेंट सुरु करतात. नवजात अर्भकास नेव्हिरापीन सिरप, अर्भकाच्या वजनानुसार देण्यात येते. या औषधोपचारामुळे एच.आय.व्ही. बाधित मातेकडून अर्भकास होणारा संसर्गाचा धोका कमी होण्यास मदत होते. सदर केद्रात येणा-या गरोदर मातेस समुह समुपदेशन केले जाते. महाराष्ट्रातील सर्वच ६१० एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्रात ही सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच ग्रमीण भागात मातांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात (२४X७) ही सेवा उपलब्ध करण्यात आलेली आहे. तसेच खाजगी दवाखान्यातून देखील गरोदर मातांचे समुपदेशन व ऐच्छिक रक्त तपासणी करीता कार्यक्रम कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

ई. आय. डी (Early Infant Diagnoses):

ई. आय. डी. कार्यक्रमात एच.आय.व्ही. संसर्गित मातांच्या १.५ ते १८ महिन्याखालील बालकांची डी.एन.ए.पी.सी.आर. (DNA PCR) तपासणी केली जाते. या तपासणीमध्ये आढळलेल्या एच.आय.व्ही. संक्रमित बालकांना ए.आर.टी. औषधोपचार सुरु केले जातात.

प्रहरी सर्वेक्षणः

राज्यामध्ये एचआयव्हीचा प्रादुर्भाव कमी झाला आहे किंवा वाढला आहे हे शोधण्यासाठी गरोदर माता व अतिजोखमीच्या गटामधील व्यक्तींचे सर्वेक्षण केले जाते. त्यानुसार २००३ ला गरोदर मातांमध्ये एचआयव्हीचे प्रमाण १.१३ टक्के होते ते आता २०१६-१७ मध्ये केलेल्या प्रहरी सर्वेक्षणानुसार ०.२६ टकके एवढे कमी झालेले आहे. तसेच २००४ मध्ये वेश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांमध्ये एचआयव्हीचे प्रमाणे ४०.४ टक्के होते ते २०१६-१७ मध्ये प्रहरी सर्वेक्षणानुसार ३.४८ टक्के एवढे कमी झालेले आहे. तसेच २००४ मध्ये समलैंगिक पुरुषांमध्ये एचआयव्हीचे प्रमाण १२.८ टक्के होते ते सन २०१६-१७ मध्ये प्रहरी सर्वेक्षणानुसार ४.६९ टक्के इतकी कमी झालेले आहे.

ॲन्टीरिट्रोव्हायरल थेरपीः

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेअंतर्गत ७३ एआरटी केंद्रे आहेत त्यापैकी ६ पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप केंद्रे (पीपीपी केंदे) महाराष्ट्रातील ३४ जिल्हयांमध्ये (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) कार्यरत आहेत.

एआरटी केंद्रांमध्ये रुग्णांना दीर्घकाळ एआरटी औषधे मोफत पुरविली जातात. माहे मे-२०१७ च्या नवीन धोरणाप्रमाणे (**Treat All Policy**) सर्व एचआयव्ही संसर्गितांना एआरटी औषधांचा लाभ दिला जात आहे. एचआयव्ही बाधीत रुग्णाला देण्यात येणाऱ्या प्रथम स्तरावरील एआरटी उपचार असफल ठरतो तेव्हा व्दितीय स्तर उपचार पद्धतीचा वापर केला जातो. (Second line ART)राज्यातील व्दितीय स्तर उपचारावर असलेल्या रुग्णांना दरमहा जे. जे. हॉस्पीटल (सेंटर ऑफ एक्सलेन्स) मुंबई येथे औषधासाठी यावे लागत होते, यामुळे मोठया प्रमाणात रुग्णांची गैरसोय होत होती ती टाळण्यासाठी राज्यात नवीन ११ विभागीय एआरटी प्लस (ART Plus) केंद्रे माहे फेब्रुवारी २०१६ पासून कार्यान्वित करण्यात आली आहेत.

एआरटी वर उपचार घेण्यातील सातत्य वाढविणे, प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी करणे, मुख्य एआरटी केंद्राचा भार कमी करणे यासाठी नॅको, नवी दिल्ली यांच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेअंतर्गत राज्यात ३४ जिल्हयांमध्ये एकूण १७७ लिंक एआरटी केंद्रे स्थापन केलेली आहेत, त्याठिकाणी एआरटी उपचार घेत असलेल्या रुग्णांना औषध पुरवठा केला जातो. नुकतेच राज्य शासनाने सर्व एचआयव्ही सह जगणाऱ्या व्यक्तींना ५०Kmच्या मर्यादेत औषध उपचारासाठी मोफत एस.टी.बस प्रवास ऑक्टोबर, २०१८ पासून सुरु केलेला आहे. सध्या राज्यात एकूण २०५५८३ रुग्ण एआरटी औषधोपचार घेत आहेत. तसेच 2nd line ART वर एकूण ९३०४ रुग्ण एआरटी औषधोपचार घेत आहेत

गुप्तरोग विभागः

एड्सवर लस उपलब्ध नसली तरी लैगिंक संबंधातून पसरणारे गुप्तरोग पूर्णपणे बरे होऊ शकतात. गुप्तरोग असणाऱ्या व्यक्तीस एचआयव्ही/एड्स होण्याची शक्यता ५ ते १० पटीनी वाढते. गुप्तरोगावर तात्काळ औषधोपचार करण्यासाठी मराएनिसं अंतर्गत महाराष्ट्रातील ३४ जिल्हयांमध्ये (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) ५३ ठिकाणी गुप्तरोग चिकित्सा केंद्रांची उभारणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी ५० गुप्तरोग चिकित्सा केंद्र मराएनिसं अंतर्गत कार्यरत आहेत.या केंद्रामधून रुग्णांना लैगिंक आजारांबाबत निदान, औषधोपचार, समुपदेशन सेवा व निरोधचा पुरवठा इत्यादी केला जातो. यामुळे एचआयव्ही/एड्सचे प्रसारण कमी करता येते. तसेच तरुण - प्रौढांना लैंगिक स्वास्थ लाभते.

सुरक्षित रक्त पुरवठाः

रक्ता मार्फत एचआयव्हीचा प्रसार टाळण्याकरिता रक्तपेढ्यांमध्ये गोळा होणाऱ्या प्रत्येक रक्त नमुन्याचे एचआयव्ही/गुप्तरोग, रक्तातील कावीळ व हिवताप जंतूकरिता तपासणी केली जाते व दुषित आढळणाऱ्या रक्त बाटल्यातील रक्त नष्ट केले जाते. राज्यात सद्या २६ रक्तपेढ्या (मुंबई व मुंबई उपनगरे वगळून) कार्यरत आहेत. स्वेच्छा रक्तदान मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे रक्दात्यांमध्ये १९९८ सालातील ४७ टक्केपासून ते सप्टें. २०१८ सालापर्यंत ९८.२० टक्क्यापर्यंत वाढझाल्यामुळे दुषित रक्ताचे प्रमाण खाली आले आहे. सन १९९८ मध्ये एचआयव्ही रिॲक्टीवीटीचे प्रमाण दरहजारी १.८ टक्के होते ते सप्टें. २०१८ अखेर दरहजारी ०.१४ टक्के पर्यंत खाली आले आहे.

स्वयंसेवी संस्थामार्फत लक्ष्यगट हस्तक्षेप प्रकल्पः

स्वंयसेवी संस्थामार्फत लक्षगट हस्तक्षेप प्रकल्प राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्र राज्यात अतिजोखमीच्या लाभार्थी गटांसाठी (उदा. देह विक्रय करणाऱ्या महिला, समलिंगी संभोग करणारे पुरुष) एड्स हस्तक्षेप प्रकल्प राबविण्यात येतात. हया प्रकल्पांचे ध्येय हे, एचआयव्ही व गुप्तरोगाचा प्रसार कमी करणे व समुदायाला भविष्यात हे प्रकल्प स्वतः हाताळण्यासाठी सक्षम करणे व ते स्वतःहा भविष्यात CBO (community Based organization)प्रस्थापित करु शकतील.

अतिजोखमीच्या लाभार्थी गटांना दिल्या जाणाऱ्या सुविधांमध्ये गुप्तरोग निदान व उपचार, एचआचव्ही व गुप्तरोग प्रतिबंधात्मक वर्तनुक बदलाव संभाषण (BCC) व समुपदेशन पुरविणे, एचआचव्ही संदर्भित सुविधा :(उदा.एआरटी उपचार, गुप्तरोग उपचार आणि क्षयरोग उपचार व इ. सेवा.), अतिजोखमीच्या

लाभार्थींना इतरही सुविधा मिळाव्यात म्हणून वेगवेगळया संस्थांशी संलग्न होणे, निरोधः अतिजोखमीच्या लाभार्थी गटांना मोफत निरोध वाटप केले जाते तरीही सामाजिक विपणन (Social Marketing) देखील पुरविले जाते. तसेच स्थलांतरी कामगार व ट्रक चालक साठी निरोध सामाजिक विपणनद्वारे (Social Marketing) पुरविले जाते. (उदा. देह विक्रय करणाऱ्या महिला, समलिंगी संभोग करणारे पुरुष आणि तृतिय पंथी. मराएनिसं द्वारा एकूण १३२ अशासकीय संस्थांचे प्रकल्प कार्यरत आहेत. व त्याद्वारे एकूण १२८१८४२ अतिजोखिम गटातील एचआयव्ही प्रतिबंधक सेवा पुरविल्या जात आहेत. तसेच विशेषतः ग्रामीण भागातील अतिजोखिम गटातील व्यक्तींकरिता लिंक वर्कर कार्यक्रमांतर्गत २० अशासकीय संस्थाचे प्रकल्प कार्यरत आहेत व त्याद्वारे ३५१७४८ अतिजोखिम गटातील एचआयव्ही प्रतिबंधक सेवा पुरविल्या जात आहेत.

निरोध वाटप कार्यक्रमः

एचआयव्ही/एड्स आणि लैंगिक आजार यांचा परस्पर संबंध असतो. असुरक्षित लैंगिक संबंध हे एचआयव्ही/एड्सच्या प्रसाराचे मुख्य कारण आहे यामुळे निरोधचा वापर हा एसटीडी आणि एचआयव्ही या दोन्हींची प्रतिबंध करण्यास उपयुक्त असल्याने त्यावर जास्त भर देण्यात येत आहे.

एप्रिल २०१८ ते ऑक्टोंबर-२०१८अखेर महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीमार्फत राज्यातील सर्व हस्तक्षेप लक्षगट प्रकल्पांमार्फत १०,१४,८५,८०० निरोधचा पुरवठा करण्यात आला. सदर पुरवठ्यातून त्यांच्या स्तरावरुन राज्यात कार्यान्वित असलेल्या एड्स हस्तक्षेप प्रकल्पांर्गत अशासकीय संस्थांना वाटप करण्यात येत आहे. तसेच गुप्तरोग चिकित्सा केंद्रे व पालकाकडून (मातेकडून) त्याच्या होणाऱ्या अर्भकास एचआयव्हीचा संसर्ग प्रतिबंध व उपचार या कार्यक्रमांतर्गत शासकीय केंद्रामधून सुध्दा निरोधचे मोफत वाटप केले जाते.

माहिती, शिक्षण आणि संवाद :

माहिती, शिक्षण आणि संवाद विभागाच्या वार्षिक कृती आराखडयानुसार महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेतर्फे मास मिडीया, प्रिंट मिडिया, आऊटडोअर मिडीया आणि मिड मिडिया यासारख्या विविध माध्यमांचा वापर स्थंलातरीत कामगार, अति जोखिम गट आणि सामान्य जनता अशा अनेक गटांमध्ये जनजागृती करण्यासाठी केला जात आहे. एचआयव्हीचा प्रतिबंध करण्यासाठी महाविदयालयीन युवकांकरीता जाणीव जागृती आणि संवेदीकरणाचे सत्र प्राधान्य क्रमाने नियमित आयोजित केली जातात. मराएनिसंने २०१० पासून एकूण १०४५ आरआरसीची स्थापना विदयापीठांअंतर्गत महाविदयालयात केलेली आहे.

मेनस्ट्रिमिंग अंतर्गत विविध गटांचे संवेदीकरण कार्यक्रमांवर विशेष भर देण्यात येते उदा.स्त्रीयांचे बचतगट, आशा, अंगणवाडीसेविका, पोलीस, महाविद्यालयीन विदयार्थी, सरकारी अधिकारी इ. त्यासाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान, आरोग्य विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समाजाचे नेतृत्व करणाऱ्यांचा सहभाग असते. हा कार्यक्रम पुढील काळात राज्यातील अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्याचा सतत प्रयत्न करण्यात येतो. तसेच सरकारी सार्वजनिक उद्योगामधील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे एचआयव्ही/एड्सविषयी संवेदीकरणकरिता त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था यांनी टोलफ्री हेल्पलाईन नं.१०९७ सुरु केली आहे. त्याची माहिती सर्वांना व्हावी याकरिता विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येते. यामध्ये मुख्यतः भिंतीचित्रावर प्रतिबंधात्मक संदेश, बॅनर्स, होर्डींग्स, तसेच द्रकश्राव्य, ऑटोरिक्षावरील माहिती फलक इ. मार्फत जनजागृती करण्यात येते.

रेड रिबन क्लब –

महाविद्यालयातील युवकांना एचआयव्हीबाबत माहिती देणे, लैंगिक वर्णन अधिक जबाबदार बनविणे , रक्तदानाचे महत्व विशद करणे आणि अधिक निकोप व निरोगी वातावरण तयार करणे यासाठी राज्यातील महाविद्यालयामध्ये सन २०१० पासून १०४५ रेड रिबन क्लब स्थापन केलेले आहेत. तसेच ते जागतिक एड्स दिन व आंतराष्ट्रीय/राष्ट्रीय युवा दिन मध्ये सहभाग घेतात. तसेच क्लबमार्फत एचआयव्ही/एड्सविषयी इतर विदयार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते.

एड्सविषयी शासन स्तरावर जनजागृती अभियान माहिती शिक्षण व संवाद कार्यक्रमाद्वारे जनजागृती

माहिती, शिक्षण व संवाद विभागामार्फत विविध कार्यक्रमांद्वारे एचआयव्ही/एड्स संदर्भात योग्य ती माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे त्याचबरोबर समाजामध्ये व विविध लक्षगटांमध्ये जनजागृती करणे व एचआयव्ही/एड्स संदर्भात उपलब्ध सेवा सुविधांचा वापर वाढविण्यासाठी विविध माध्यमे वापरली जातात. आधुनिकीकरणामुळे सोशल मिडीयाचा वाढता वापर लक्षात घेता राज्य तथा जिल्हास्तरावरव्हॉटसअॅप ग्रुप तयार करण्यात आलेले आहेत. त्यामार्फत एचआयव्ही/एड्सविषयी जनाजागृती माहिती साहित्यतथा दुकश्राव्य पाठविण्यात येत आहे.

- आधुनिकीकरणामुळे सोशल मिडीयाचा वाढता वापर लक्षात घेता राज्य तथा जिल्हास्तरावर व्हॉटसअॅप ग्रुप तयार करण्यात आलेले आहेत. त्यामार्फत एचआयव्ही/एड्सविषयी जनाजागृती माहितीसाहित्य तथा दुकश्राव्य पाठविण्यात येत आहे.
- राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था यांनी टोलफ्री हेल्पलाईन नं.१०९७ सुरु केली आहे. त्याची माहिती सर्वांना व्हावी याकरिता विविध माध्यमातून जनजागृती करण्यात येते. यामध्ये मुख्यतः भिंतीचित्रावर प्रतिबंधात्मक संदेश, बॅनर्स, होर्डींग्स, तसेच द्रकश्राव्य, ऑटोरिक्षावरील माहिती फलक इ. मार्फत जनजागृती करण्यात येते.

मास मिडियाः लॉग फॉरमॅट टी व्ही प्रोग्रॅमः

दूरदर्शन व रेडीओ कार्यक्रमः मराएनिसंने जागतिक एड्स दिन, युवा दिन व इतर उपक्रमांच्या निमित्ताने एचआयव्ही/एड्सविषयी जनजागृतीपर विविध कार्यक्रम राबविण्यात येतात.
सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेतर्फे एचआयव्ही/एड्सविषयी प्रतिबंध, उपचार, काळजी आधार व निगा या बाबत माहिती देण्यात येते, तसेच आकाशवाणीच्या राज्यातील सर्व केंद्रावरुन प्रसारित करण्यात येते.

वर्तमानपत्रातून जाहिरातीः महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयातील सर्वाधिक खप असणाऱ्या एचआयव्ही/एड्स विषयावर जागतिक एड्स दिनानिमित्तीची १ जाहिरात वर्तमानपत्रातून प्रसिध्द करण्यात येते. तसेच जागतिक एड्स दिनानिमित्त सर्व जिल्हयात एचआयव्ही/एड्सविषयीची जनजागृती व उपक्रमाची माहिती देण्यात येते. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय युवा दिनानिमित्त एचआयव्ही/एड्सविषयी उपक्रमास प्रसिध्दी देण्यात येते.
मुखपत्र (न्यूजलेटर): निर्धार या ई-मुखपत्राद्वारे माहिती प्रकाशित करण्यात येते. यामध्ये कथा, लेख, उपक्रमांची माहिती इत्यादीचा समावेश करण्यात येतो. सदरील अंक राज्यातील क्षेत्रिय कार्यालयांना, स्वयंसेवी संस्थांना, अधिकाऱ्यांना, जिल्हा कक्षांना व इतरांना ईमेल व सोशल मिडीयाच्या माध्यमातून देण्यात येत आहे.

मिड मिडीया :
कलापथक अभियानःमहाराष्ट्रातील जिल्हास्तरावर विविध गावात/भागात लोककलेतून एचआयव्ही/एड्सविषयी कलापथकांमार्फत जनजागृती अभियान राबविण्यात येते.

माहिती, शिक्षण व संवाद जनजागृती साहित्य :
मराएनिसंच्या माहिती,शिक्षण व संवाद विभागातर्फे एचआयव्ही/एड्सविषयी विविध सेवा विषयीचे आयसीटीसी, एआरटी, पीपीटीसीटी, गुप्तरोग, रक्त सुरक्षा, स्थलांतरीत कामगार ट्रक ड्रायव्हर्स, रक्तपेढी, अति जोखमीचे गट इ. विषयावरील विविध जनजागृती साहित्य छपाई करुन जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून वितरीत करण्यात येतात.

मेनस्ट्रिमिंग प्रशिक्षण

मेनस्ट्रिमिंग म्हणजे एचआयव्ही/एड्स विषयी मुलभूत माहिती सर्व स्तरावरील लोकापर्यंत पोहचवून त्यांना एचआयव्ही/एड्स मुक्त जीवन जगण्यासाठी प्रेरित करणे हे होय. यामध्ये व्यावसायिक क्षेत्र, नागरी समाज, बचत गटातील महिला, शिक्षक, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी, पोलिस, गोदी कामगार, साखर कारखान्यातील कामगार, ओदयौगीक कामगार व त्यांचे अधिकारी व सरकारी यंत्रणेतील कार्यरत सर्व विभागातील कार्यरत अधिकारी, अंगणवाडी कार्यकर्त्या, आशा कार्यकर्त्या, बचतगट सदस्य, बालविकास व बालसंरक्षण अधिकारी व एनवायकेएस अधिकारी तसेच अंगणवाडी पर्यवेक्षिका यांचा समावेश आहे. याशिवाय महाविदयालयातील प्राध्यापक व प्राचार्य वरिष्ठ महाविदयालयातील विदयार्थी-विदयार्थीनी यांचा समावेश आहे

प्रासंगिक दिनः

दरवर्षी जागतिक एड्स दिन (१ डिसेंबर), आंतरराष्ट्रीय युवा दिन (१२ ऑगस्ट), राष्ट्रीय युवा दिन (१२ जानेवारी) निमित्त राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. यामध्ये युवकांकरिता विविध उपक्रम राबविण्यात येतात. सदर उपक्रमांमध्ये प्रभातफेरी, शाळा व महाविदयालयांमध्ये तज्ञांचे व्याख्यान, चित्रप्रदर्शन, माहिती चित्रे, विविध स्पर्धा, द्रकश्राव्य इत्यादींच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येते.

रेड रिबन क्लब -

महाविद्यालयातील युवकांना एचआयव्हीबाबत माहिती देणे, लैंगिक वर्णन अधिक जबाबदार बनविणे , रक्तदानाचे महत्व विशद करणे आणि अधिक निकोप व निरोगी वातावरण तयार करणे यासाठी राज्यातील महाविद्यालयामध्ये सन २०१० पासून १०४५ रेड रिबन क्लब स्थापन केलेले आहेत. तसेच ते जागतिक एड्स दिन व आंतराष्ट्रीय/राष्ट्रीय युवा दिन मध्ये सहभाग घेतात. तसेच क्लबमार्फत एचआयव्ही/एड्सविषयी इतर विदयार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते.